# वसई विरार शहर महानगरपालिका

## प्रभाग समिती "डी" नालासोपारा, आचोळे (पू.)

### जाहिर निविदा सुचना क्र. - २ (सन २०१९-२०२०)

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील खाली उल्लेख केल्याप्रमाणे विकास कामे करणेकामी शासनाचे विद्युत विभागाकडे योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडुन बी-१ व बी-२ नमुन्यात व्दिलखोटा पध्दतीनुसार महानगरपालिकेच्या अटी व शर्तीस अधिन राहुन मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म दि.२७/०८/२०१९ ते दि.०३/०९/२०१९ पर्यंत सायं ३.०० वाजेपर्यंत सुट्टीचे दिवसाखेरीज महानगरपालिकेच्या कार्यालयीन कामकाजाचे वेळेत विद्युत विभाग, प्रभाग समिती ""डी", नालासोपारा,आचोळे (पू.) यांचे कर्यालयात रोखीने विकत मिळतील. सदर कामांची इसारा रक्कम आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका या नावे देय असलेल्या डिमांड ड्राफ्ट व्दारे भरावी लागेल व सदर डिमांड ड्राफ्ट निविदेसोबत जोडावा लागेल. डिमांड ड्राफ्ट व्दारे इसारा न भरलेल्या, खाडाखोड केलेल्या, मुदतीत न आलेल्या व सशर्त निविदा नाकारण्यात येतील. सदर कामी पुर्णपणे भरलेल्या मोहरबंद निविदा दि०४/०९/२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत महानगरपालिकेच्या विद्युत विभाग, प्रभाग समिती प्रभाग समिती "डी", नालासोपारा, आचोळे (पू.) यांचे कार्यालयात ठेवलेल्या सिलबंद निविदा पेटीत टाकण्यात याव्यात. प्राप्त निविदा या विद्युत विभाग, प्रभाग समिती "डी", नालासोपारा, आचोळे (पू.) यांचे कार्यालयात हजर निविदा धारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष त्याच दिवशी दुपारी ३.०१ मी. वाजे पर्यंत प्रथम तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र. ०१ उघडण्यात येईल. लिफाफा क्र. ०१ मध्ये सविस्तर निविदा सुचनेमध्ये दर्शविल्यानुसार कागदपत्रे असल्यास वित्तीय बोलीचा लिफाफा क्र. ०२ उघडण्यात येईल. याकामी आलेल्या निविदांपैकी कोणताही एक निविदा स्विकारण्याचा अथवा अलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अदांजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम रुपये १% | निविदा फॉर्म फी | सुरक्षा अनामत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती "डी" प्रभाग क्रमांक ६२ मधील महेशपार्क उद्यानात नविन कंट्रोल पॅनल तयार करणे. | १,२८,६०८/- | १,२८६/- | २००/- +१२% GST =२२४/- | मंजुर घटकाच्या दरानुसार होणा-या अंदाजित रक्कमेवर २% डी. डी. ने २% बिलातून | ३० दिवस |
| २ | प्रभाग समिती "डी" कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्थे अंतर्गत स्वयंचलित टायमर फिडर पिलर खरेदी करणे व कार्यान्वित करणे. | २,९९,०१०/- | २,९९०/- | २००/- +१२% GST =२२४/- | मंजुर घटकाच्या दरानुसार होणा-या अंदाजित रक्कमेवर २% डी. डी. ने २% बिलातून | ३० दिवस |
| ३ | प्रभाग समिती "डी" कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्थे कामी केबल खरेदी करणे. | २,९९,६८४/- | २,९९७/- | २००/- +१२% GST =२२४/- | मंजुर घटकाच्या दरानुसार होणा-या अंदाजित रक्कमेवर २% डी. डी. ने २% बिलातून | ३० दिवस |

## अटी-शर्ती

१) मॅन्युअल पध्दतीने फॉर्म खरेदीची अंतिम दि. ०३/०९/२०१९ रोजी पर्यंत राहील.

२) निविदा दि.२७/०८/२०१९ रोजी पासुन ते दि. ०३/०९/२०१९ रोजी पर्यंत सुट्टीच्या दिवसाखेरीज महानगरपालिकेच्या कार्यालयीन वेळेत रोखीने मिळतील.

३) कोरे निविदा फॉर्मची मागणी करतेवेळी अर्जा सोबत विद्युत विभागाच्या नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

४) ज्या ठेकेदाराचे नावे कामाचे नोंदणी प्रमाणपत्र आहे त्याची मुळ कागदपत्रासह स्वत: अगत अधिकृत प्रतिनिधी मार्फत कोरे निविदा फॉर्म घेवून आवश्यक आहे.

५) सदरहू कामांच्या निवेदेसाठी व्दिलखोटा पध्दतीचा अवलंब करावयाचा आहे.

६) ठेकेदाराने निविदा भरताना गुड्स ॲण्ड सर्विस टॅक्स (GST) चा विचार करुन निविदा दर भरावे.

७) निविदाधरकांची सादर केलेल्या तांत्रिक बोलिचा लिफाफा क्रमांक १ मध्ये

१) सर्वाजनिक बांधकाम विभागाच्या योग्य वर्गातील नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित पत्र

Scanned by CamScanner

२) इसारा रक्कमेचा धनाकर्ष

३) निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-१) ५००/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिफाफा क्र.१ मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक आहे.

४) GST सर्टिफिकेट

## परफॉर्मन्स सिक्युरीटी :-

महाराष्ट्र शासन, सार्व. बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. बीडीजी २०१६ / प्र.क्र. २ / इमा.२, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दि. १२/०२/२०१६ नुसार जर ठेकेदार अंदाजपत्रकीय दरामध्ये कमी दराने निविदा भरत असेल तर या प्रकरणी लिफाफा क्र.२ मध्ये परफॉर्मन्स सिक्युरीटी करीता धनाकर्ष सादर करावयाचा असुन त्या संदर्भातील कंत्राटदारास सुचना

१. अंदाजपत्रकिय रक्कमेपेक्षा कमी किंमतीच्या देकर असल्यास इसारा रक्कमे बरोबर अतिरिक्त जमा लागणारे परफॉमर्न्स सिक्युरिटी पुढील प्रमाणे.

- निम्नतम निविदेचा देकार निविदाधीन किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर तसेच देकारा १०% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे तेवढया रक्कमेचा व वरिल बाब ४ प्रमाणे येणाऱ्या रक्कमेसह एकत्रित धनाकर्ष (Demand Draft) निविदेसोबत लिफाफा क्रमांक २ मध्ये सादर करावा. (उदा. १४% कमी दर - १०% पर्यंत करिता १% व (१४% व १०%)- ४% असे एकूण ५%) (शासन परिपत्रक २०१८ नुसार)
- अंदाजपत्रकिय रक्कमेपेक्षा कमी किमतीच्या देकर देणाऱ्या निविदाधारकांने परफॉर्मन्स सिक्युरिटीच्या डिपॉझीटच्या धनाकर्ष (डी.डी.) स्कॅन करुन लिफाफा क्र.२ मध्ये सादर केला असल्याचे प्रतिज्ञापत्र लिफाफा क्र.१ मध्ये सादर करणे अनिवार्य आहे.
- सदरच्या परफॉर्मन्स सिक्युरिटीच्या डिपॉझिटच्या धनाकर्ष (डी.डी.) सिलबंद लिफाफा मधून कन्ट्रक दाराने लिफाफा क्र.१ व लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर ८ दिवसांच्या आत मा.सहा.आयुक्त यांच्या कार्यालयात जमा करावा. लिफाफा वर कामाचे नाव व निविदा सुचना क्रमांक लिहिण्यात यावा. (शासन परिपत्रक २०१८ नुसार)
- Additional prrformance Security is permitted to be accepted in the form of DD/FDR/BG of any nationalized / scheduled Bank. This shall be enclosed in the financial envelope (Envelope no.२.) Aself attested affidavit that Additional performance Security is enclosed in envelope no. २ shall be include in the Technical Envelope no. १ if the Additional performance Security is not found included in envelope no.२ (Financial envelope) (in cases which are found below १- of amound put to tender) the offer shall be treated as invalid and rejected fourth with.
- Additional Performance Security for tenders below estimated cost shall be released on the day of opening of the finacial bid except for L-1 and L-2. The Addironal Performance Security of L-2 Shall be released within time limit of 30 subsequent working days or award of work to L-1 whichever is later.

२. सदर कामाबाबत निविदाधारकाकडून तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास फेरनिविदा मागविण्यात येतील. तसेच कोणत्याही कारणाशिवाय निविदा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

३. निविदा सादर करताना निविदा पत्रक पोस्टाने किंवा कुरीयरने पाठवु नये पोस्टानी व कुरीयरने पाठविलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

४. निविदा मंजुर झालेनंतर मंजुर ठेकेदाराने अंदाजीत खर्चाच्या २% सुरक्षा अनामत रक्कम महानगरपालिकेकडे रोखीने/डिमांड ड्राफ्टने भरणा करुन काररपत्र करणे आहे व २% सुाक्षा अंतिम बिलातुन कपात करण्यात येईल.

५. निविदेमधील दर पुर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा नाकारणेचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवला असून कोणतीही एक निविदा स्विकारणे अथवा सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार महानगरपालिकेला राहील.

६. आलेल्या निविदा शक्य असल्यास निश्चित केलेल्या तारखेला उपस्थित निविदाधारक अथवा त्यांचे प्रतिनीधी यांच्या समक्ष उघडण्यात येतील. सर्शत निविदा नाकारण्यांत येतील.

Scanned by CamScanner

७. निविदा मंजुरीची समज मिळालेनंतर महानगरपालिका कार्यालयात उपस्थित राहून स्टॅम्प करारपत्रावर करारनामा लिहून देण्याचे आहे.

८. निविदे सोबत भरलेल्या अनामत रक्कमेवर कोणत्याही स्वरुपात व्याज दिले जाणार नाही. तसेच मालाचे/ साहित्याचे पुरवठयाबाबतचे कोणतीही आगाऊ रक्कम महानगरपालिकेकडून पुरवठादाराला दिली जाणार नाही.

९. निविदा उघडताना प्रथम तांत्रिक माहितीचा लिफाफा क्र.१ उघडण्यात येईल व समाधानकारक कागदपत्र असल्याची खात्री झाल्यावर वित्तीय बाबीचा लिफाफा क्र.२ उघडण्यात येईल अन्यथा अशी निविदा विचारात घेतली जाणार नाही.

१०. कोणतीही एक अथवा सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा स्विकारण्याचा अधिकार मा.आयुक्त वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.

११. ठेकेदाराने निविदेत भरलेले कमीत कमी दराप्रमाणे उत्कृष्ट दर्जाचे काम करुन देणे बंधनकारक राहील.

१२. निविदा संबधी सविस्तर माहिती विद्युत विभाग, मुख्य कार्यालय विरार पुर्व येथे कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळेल.

१३. अट क्र. ७ (३) मध्ये नमुद केल्यानुसार निविदेसोबत लखोटा क्र. १ मधील कागदपत्र खोटी किंवा बनावट असल्याचे निदर्शनास आल्यास त्यास कंत्राटदार पूर्णपणे जबाबदार रहातील व त्यांचेवर शासन निर्णय सीएटी/२०१८/५ क्र.१२७/ इमा - २ दि.२८/११/२०१८ मध्ये नमुद केल्यानुसार कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

जा. क्र : वि.वि.श.म/नासो/विवि/१०८५/२०१९.
दिनांक : २७/०८/२०१९.

प्र. सहा. आयुक्त
प्रभाग समिती डी
वसई विरार शहर महानगरपालिका

Scanned by CamScanner